# १०० मराठी वाक्प्रचार

अर्थ व वाक्यात उपयोग | PDF Download 2026

मराठी परीक्षेत वाक्प्रचारांवर आधारित प्रश्न नेहमीच विचारले जातात. या संग्रहात **१०० महत्वाचे मराठी वाक्प्रचार** त्यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोगासह दिले आहेत. **MPSC, PSI, STI, ASO, ZP** आणि **SSC Board** परीक्षेच्या दृष्टीने हे वाक्प्रचार अत्यंत उपयुक्त आहेत.
**वाक्प्रचार म्हणजे :** शब्दांचा समूह जो नेहमीच्या अर्थापेक्षा वेगळ्या विशिष्ट अर्थाने वापरला जातो त्यास वाक्प्रचार म्हणतात.

## अ — आ वर्णापासून सुरू होणारे वाक्प्रचार

| क्र. | वाक्प्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|---|
| १ | **अंगात वीज संचारणे** | अचानक बळ येणे | देशभक्तीपर गाणी ऐकून नागरिकांच्या अंगात वीज संचारते. |
| २ | **अंगाची लाही लाही होणे** | अतिशय संताप होणे | पूर्ण दिवस काम करूनही पैसे न मिळाल्याने दिनेशच्या अंगाची लाही लाही झाली. |
| ३ | **अंग चोरून काम करणे** | फारच थोडे काम करणे | अंग चोरून काम करणे ही आळशी लोकांची सवय असते. |
| ४ | **अंगवळणी पडणे** | सवय होणे | सकाळी लवकर उठून व्यायाम करणे हे भरतच्या अंगवळणी पडले आहे. |
| ५ | **अंगावर शहारे येणे** | खूप घाबरणे | भूकंपाने झालेली हानी पाहून मदत पथकातील सर्वांच्याच अंगावर शहारे आले. |
| ६ | **अंगावर मूठभर मांस चढणे** | धन्यता वाटणे | गुरूने केलेल्या स्तुतीमुळे मानसीच्या अंगावर मूठभर मांस चढले. |
| ७ | **अंतर देणे** | सोडून देणे | मुलांनी आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांना कधीही अंतर देऊ नये. |
| ८ | **अंत होणे** | मृत्यू होणे | अपघातामुळे अशोकचा दुःखद अंत झाला. |
| ९ | **अधीर होणे** | उत्सुक होणे | चार वर्षांनी आईला भेटण्यासाठी राहुल अधीर झाला होता. |
| १० | **अन्नास मोताद होणे** | गरीबीत दिवस काढणे | दुष्काळाने ग्रासलेल्या भागातील लोक अन्नास मोताद झाले. |
| ११ | **अभिमान वाटणे** | गर्व वाटणे | व्यवसायात मोठे यश मिळविल्यामुळे रमेशचा सर्वांना अभिमान वाटतो. |
| १२ | **अभिवादन करणे** | नमस्कार करणे | विशाखाने आई बाबांना अभिवादन केले. |
| १३ | **अवहेलना करणे** | अपमान करणे | माणसाच्या गरिबीवरून त्याची कधीही अवहेलना करू नये. |
| १४ | **अस्मान ठेंगणे होणे** | गर्वाने फुगून जाणे | परदेशी जाण्याची संधी मिळाल्यावर सुमीतला अस्मान ठेंगणे झाले. |
| १५ | **आण घेणे** | शपथ घेणे | पोलिस झालेल्या प्रतिकने लाच न घेण्याची आण घेतली. |
| १६ | **आत्मसात करणे** | शिकणे | एखादी नवीन कला आत्मसात करावी लागते. |
| १७ | **आसन डळमळणे** | बसलेला जम विस्कटणे | सत्ताधारी पक्षातील घोटाळे उघडकीस आल्याने मुख्यमंत्र्यांचे आसन डळमळीत झाले. |

## क — ख वर्णापासून सुरू होणारे वाक्प्रचार

| क्र. | वाक्प्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|---|
| १८ | **कंबर कसणे** | हिमतीने तयार होणे | १० वी च्या परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी सुरेशने कंबर कसली. |
| १९ | **कंठस्नान घालणे** | ठार मारणे | सीमेवर भारतीय सैनिकांनी शत्रूच्या सैनिकांना कंठस्नान घातले. |
| २० | **कपाळाला हात लावणे** | हताश होणे | सामना सुरू होण्यापूर्वी पाऊस सुरू झाल्याने प्रेक्षकांनी कपाळाला हात लावला. |
| २१ | **कपाळमोक्ष होणे** | मरण पावणे | दारू पिऊन गाडी चालविताना अपघात झाल्याने राकेशचा कपाळमोक्ष झाला. |
| २२ | **कान टोचणे** | चूक लक्षात आणून देणे | परीक्षेत मोबाईल खेळणाऱ्या मानसीचे तिच्या वडिलांनी कान टोचले. |
| २३ | **कान उपटणे** | कडक शब्दांत समजावणे | शाळेमध्ये दंगा करणाऱ्या दिनेशचे मुख्याध्यापकांनी कान उपटले. |
| २४ | **कान फुंकणे** | मनात शंका निर्माण करणे | एकमेकांचे कान फुंकल्याने कुटुंबात अनेकदा वाद निर्माण होतात. |
| २५ | **कानावर घालणे** | लक्षात आणून देणे | रोहितला कमी गुण मिळाल्याचे शिक्षकांनी त्याच्या वडिलांच्या कानावर घातले. |
| २६ | **काढता पाय घेणे** | परिस्थिती पाहून निघून जाणे | वाद होण्याची चिन्हे दिसू लागताच राजेशने बैठकीतून काढता पाय घेतला. |
| २७ | **कापरे सुटणे** | घाबरल्यामुळे थरथरणे | अचानक समोर आलेला वाघ पाहून राहुलच्या अंगाला कापरे सुटले. |
| २८ | **कस लावणे** | सामर्थ्य पणाला लावणे | हिंदकेसरी होण्यासाठी गण्या पहेलवानाने प्रत्येक कुस्तीत आपला कस लावला. |
| २९ | **कसब दाखवणे** | कौशल्य दाखवणे | कोणताही खेळ असो, खेळाडू त्यात आपले कसब दाखवतात. |
| ३० | **किरकिर करणे** | सतत तक्रार करणे | मालकापाशी मजूर पगार कमी आहे म्हणून किरकिर करतात. |
| ३१ | **कुंपणाने शेत खाणे** | विश्वासू माणसाने घात करणे | व्यवस्थापकाने भ्रष्टाचार केल्याने कुंपणानेच शेत खाल्ल्याची चर्चा रंगली. |
| ३२ | **केसाने गळा कापणे** | विश्वासघात करणे | नोकराने चोरी करून सदाशिव रावांचा केसाने गळा कापला. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | **खंड न पडणे** | मध्ये न थांबणे | नित्यनेमाने देवपूजा करण्यात आजीचा कधीही खंड पडला नाही. |
| ३४ | **खपणे** | कष्ट करणे | चांगले पीक काढण्यासाठी शेतकरी दिवसभर शेतात खपतात. |
| ३५ | **खांद्याला खांदा भिडवणे** | एकत्र येऊन काम करणे | आजच्या युगात स्त्री-पुरुष एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून काम करतात. |

## ग — घ / च — छ / ड वर्णापासून सुरू होणारे वाक्प्रचार

| क्र. | वाक्प्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|---|
| ३६ | **गट्टी जमणे** | मैत्री होणे | गावी आलेल्या मालूची गावातल्या शालूशी चांगली गट्टी जमली. |
| ३७ | **गळ्यात गळा घालणे** | खूप पक्की मैत्री असणे | सोनाली आणि प्रियांका नेहमी गळ्यात गळा घालून फिरतात. |
| ३८ | **गुडघे टेकणे** | शरण येणे | शिवाजी महाराजांच्या मावळ्यांपुढे मुघल फौजांनी गुडघे टेकले होते. |
| ३९ | **चेहरा खुलणे** | आनंद होणे | लग्नाची तारीख ठरल्याचे कळताच मोनलचा चेहरा खुलला. |
| ४० | **चेहरा पडणे** | दुःख होणे | अपेक्षित गुण न मिळाल्याने पल्लवीचा चेहरा पडला. |
| ४१ | **छातीत धडधडणे** | खूप भीती वाटणे | जंगलात अचानक सिंह समोर आल्याने पर्यटकांच्या छातीत धडधडले. |
| ४२ | **डाळ न शिजणे** | काही उपाय न चालणे | साक्षीने दिपकला पटवायचे बरेच प्रयत्न केले पण तिची डाळ शिजली नाही. |
| ४३ | **डोक्यावर खापर फोडणे** | दोषी ठरवणे | अनेकदा निरपराध लोकांच्या डोक्यावर गुन्ह्याचे खापर फोडले जाते. |
| ४४ | **डोक्यात वीज चमकणे** | पटकन समजणे | कठीण गणित सुटत नव्हते पण एका क्षणाला दिनेशच्या डोक्यात वीज चमकली. |
| ४५ | **डोळा असणे** | लक्ष असणे | शत्रूच्या प्रत्येक हालचालीवर आपल्या जवानांचा डोळा असतो. |
| ४६ | **डोळा लागणे** | झोप लागणे | दिवसभर काम केल्याने सौरभचा रात्री अंथरुणावर पडल्यावर लगेचच डोळा लागला. |
| ४७ | **डोळे उघडणे** | अनुभवाने सावध होणे | आजारी पडल्याने सुमितचे व्यायाम करण्याबाबत डोळे उघडले. |
| ४८ | **डोळेझाक करणे** | दुर्लक्ष करणे | माणूस नेहमीच स्वतःच्या चुकांकडे डोळेझाक करतो. |
| ४९ | **डोळे निवणे** | समाधानी होणे | विठ्ठलाच्या दर्शनाने वारकऱ्यांचे डोळे निवले. |
| ५० | **डोळे पांढरे होणे** | प्रचंड भीती वाटणे | डोळ्यासमोर भीषण अपघात पाहताच सोहमचे डोळे पांढरे झाले. |
| ५१ | **डोळे विस्फारणे** | आश्चर्याने पाहणे | सचिनला अचानक पाहून त्याच्या चाहत्यांचे डोळे विस्फारले. |
| ५२ | **डोळे मिटणे** | मरण पावणे | क्रांतिकारकांनी देशासाठी लढताना आनंदाने डोळे मिटले. |
| ५३ | **डोळे वटारणे** | रागाने पाहणे | वर्गात दंगा करणाऱ्या मुलांकडे गुरुजींनी डोळे वटारून पाहिले. |
| ५४ | **डोळ्यात धूळ फेकणे** | खोटे बोलून फसवणे | जमिनीच्या लालसेपोटी सुधाकरने त्याच्या भावाच्या डोळ्यात धूळ फेकली. |

## त — थ / द — ध / न वर्णापासून सुरू होणारे वाक्प्रचार

| क्र. | वाक्प्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|---|
| ५५ | **तळपायाची आग मस्तकात जाणे** | खूप राग येणे | मुलाचे खोटे बोलणे ऐकून राहुलच्या तळपायाची आग मस्तकात गेली. |
| ५६ | **तोंड देणे** | सामना करणे | प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देणाऱ्यालाच शेवटी यश मिळते. |
| ५७ | **तोंड काळे करणे** | कायमचे निघून जाणे | चोरी करताना सापडल्याने साखरामने गावातून तोंड काळे केले. |
| ५८ | **तोंडचे पाणी पळणे** | अतिशय घाबरणे | अवघड प्रश्नपत्रिका पाहून विद्यार्थ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. |
| ५९ | **तोंडघशी पडणे** | खोटे पकडले जाणे | खोटं बोलणे पकडले गेल्याने वनिता तोंडघशी पडली. |
| ६० | **तोंडात बोट घालणे** | आश्चर्यचकित होणे | बारावीत पहिला क्रमांक आल्याचे कळताच कोमलने तोंडात बोट घातले. |
| ६१ | **तोंडाला पाणी सुटणे** | हाव निर्माण होणे | गुलाबजाम पाहून तन्वीच्या तोंडाला पाणी सुटले. |
| ६२ | **तोंडाला कुलूप घालणे** | गप्प बसणे | परीक्षेत कमी गुण मिळाल्याने अविनाश तोंडाला कुलूप घालून बसला होता. |
| ६३ | **दात ओठ खाणे** | राग व्यक्त करणे | लोकांसमोर झालेला अपमान पाहून मयूर दात ओठ खात निघून गेला. |
| ६४ | **दात विचकणे** | निर्लज्जपणे हसणे | सायकलवरून मुलगा पडल्याचे दिसताच अभिषेक दात विचकून हसत होता. |
| ६५ | **दिवस पालटणे** | परिस्थिती बदलणे | खूप मेहनत केली तर आपले दिवस नक्की पालटतात. |
| ६६ | **धडपड करणे** | खूप कष्ट करणे | पोट भरण्यासाठी महादू दिवसभर काही ना काही धडपड करतो. |
| ६७ | **धन्य होणे** | कृतार्थ होणे | मुलाचे उज्ज्वल यश पाहून यशोदाबाई धन्य झाल्या. |
| ६८ | **धास्ती घेणे** | धसका घेणे | एकदा पाय घसरून पडल्यामुळे मीराबाई अंधारात जाण्याची धास्ती घेतली. |
| ६९ | **धूम ठोकणे** | पळून जाणे | पोलिसांना पाहताच चोरांनी धूम ठोकली. |
| ७० | **नवल वाटणे** | आश्चर्य वाटणे | आईने आणलेली नवी सायकल पाहून विघ्नेशला नवल वाटले. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | नाक खुपसणे | गरज नसताना सहभागी होणे | नाक खुपसण्याच्या सवयीमुळे शोभाचे अनेकदा हसू झाले. |
| ७२ | नाक कापणे | अपमान करणे | मुलगा नापास झाल्याने मीरा काकूंचे सर्वांसमोर नाक कापले. |
| ७३ | नाक मुरडणे | नापसंती दर्शवणे | दिवाळीला आणलेला नवा ड्रेस न आवडल्याने सोनमने नाक मुरडले. |
| ७४ | नाकी नऊ येणे | दमछाक होणे | महागाईमुळे घर चालविताना सीमा काकूंच्या नाकी नऊ येतात. |
| ७५ | नाक घासणे | लाचार होऊन माफी मागणे | चुकीचा आरोप केल्याचे सिद्ध झाल्याने अनिकेतला सर्वांसमोर नाक घासावे लागले. |
| ७६ | नजर चुकवणे | गुपचूप हालचाल करणे | पोलिसांची नजर चुकवून चोर पळून गेले. |

## प — फ / ब — भ / ह / इतर महत्वाचे वाक्प्रचार

| क्र. | वाक्प्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|---|
| ७७ | पदरी घेणे | स्वीकार करणे | पतीचे निधन झाल्यावर कमलाबाईंनी एकाकीपणाचे दुःख पदरी घेतले. |
| ७८ | पहारा देणे | राखण करणे | भारतीय सैनिक सीमेवर रात्रंदिवस कडक पहारा देतात. |
| ७९ | पाय घसरणे | मोहात फसणे | झटपट श्रीमंत होण्याच्या नादात अनेक जणांचा पाय घसरतो. |
| ८० | पाय मोकळे करणे | फिरायला जाणे | जेवण झाल्यावर लोक पाय मोकळे करायला जातात. |
| ८१ | पारंगत असणे | तरबेज असणे | वयाच्या तिसऱ्या वर्षी छोटा राहुल संगणक वापरण्यात पारंगत झाला. |
| ८२ | पोटाशी धरणे | माया करणे | कांगारू आपल्या पिलाला नेहमी पोटाशी धरून असते. |
| ८३ | पोटात ठेवणे | गुपित सांभाळणे | दहावीत नापास झाल्याची गोष्ट त्याने सर्वांपासून पोटात ठेवली. |
| ८४ | पोरकी होणे | अनाथ होणे | करोना साथीमुळे खूप मुले पोरकी झाली. |
| ८५ | प्रत्यय येणे | प्रचीती येणे | आषाढी एकादशीला भक्तांच्या विठ्ठलभक्तीचा प्रत्यय येतो. |
| ८६ | प्रभावित होणे | छाप पडणे | महात्मा गांधीजींचे देशकार्य पाहून विनोबा भावे प्रभावित झाले. |
| ८७ | प्रतीक्षा करणे | वाट पाहणे | बस येण्याची आम्ही बस स्थानकावर प्रतीक्षा करत होतो. |
| ८८ | भान ठेवणे | जाणीव ठेवणे | दुःखात साथ करणाऱ्या उपकारकर्त्याचे माणसाने नेहमी भान ठेवावे. |
| ८९ | भुरळ पडणे | मोह होणे | गीताने काढलेल्या सुंदर चित्राकडे पाहून मितालीला भुरळ पडली. |
| ९० | हात देणे | मदत करणे | गावातील संपदकाका गरीब लोकांना नेहमी मदतीचा हात देतात. |
| ९१ | हातातोंडाशी गाठ पडणे | जेमतेम खायला मिळणे | शेव सर्वांना वाटता वाटता रामूच्या हातातोंडाशी गाठ पडली. |
| ९२ | हाडे खिळखिळी करणे | खूप मार देणे | पोलिसांनी चोरांना पकडून त्यांची हाडे खिळखिळी केली. |
| ९३ | हेवा वाटणे | मत्सर वाटणे | सागरच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा त्याच्या मित्रांना नेहमी हेवा वाटतो. |
| ९४ | जिभेला हाड नसणे | वाटेल ते बोलणे | राग आलेली व्यक्ती जिभेला हाड नसल्याप्रमाणे बोलते. |
| ९५ | जीव की प्राण असणे | खूप प्रिय असणे | प्रत्येक व्यक्तीसाठी त्याचा देश जीव की प्राण असतो. |
| ९६ | रक्ताचे पाणी करणे | अतिश्रम करणे | जॉब मिळविण्यासाठी रक्ताचे पाणी करावे लागते. |
| ९७ | लाडीगोडी लावणे | खुश करणे | लहान भाऊ आईने पैसे द्यावेत म्हणून लाडीगोडी लावत होता. |
| ९८ | वारा फिरणे | परिस्थिती बदलणे | खूप मेहनत केल्यावर आपल्या आयुष्यातील वारा फिरतो. |
| ९९ | विडा उचलणे | जबाबदारी स्वीकारणे | गावाचा विकास करण्याचा विडा तरुण सरपंचाने उचलला. |
| १०० | स्तिमित होणे | आश्चर्यचकित होणे | मोनलचे नृत्य पाहून सर्व प्रेक्षक स्तिमित झाले. |

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)

**प्र. वाक्प्रचार म्हणजे काय ?**

उ. शब्दांचा समूह जो नेहमीच्या अर्थापेक्षा वेगळ्या विशिष्ट अर्थाने वापरला जातो त्यास वाक्प्रचार म्हणतात. वाक्प्रचारामुळे भाषेला अधिक प्रभावीपणा आणि सौंदर्य प्राप्त होते.

**प्र. MPSC परीक्षेत किती वाक्प्रचार विचारले जातात ?**

उ. MPSC परीक्षेत साधारणतः ५ ते १० वाक्प्रचारांवर आधारित प्रश्न विचारले जातात. त्यामुळे किमान १०० वाक्प्रचार पाठ असणे आवश्यक आहे.

**प्र. वाक्प्रचार आणि म्हण यात काय फरक आहे ?**

उ. वाक्प्रचार अपूर्ण वाक्यात वापरला जातो तर म्हण स्वतंत्र पूर्ण विचार व्यक्त करते. वाक्प्रचाराला क्रियापद जोडावे लागते.

**प्र. इयत्ता १० वी साठी कोणते वाक्प्रचार महत्वाचे आहेत ?**

**उ.** SSC Board साठी कंबर कसणे, तोंडाला पाणी सुटणे, डोळेझाक करणे, नाकी नऊ येणे, अंगावर शहारे येणे हे वाक्प्रचार अत्यंत महत्वाचे आहेत.

**marathi-shala.com**

अधिक मराठी वाक्प्रचार, म्हणी, व्याकरण यासाठी भेट द्या